एकात्मिक व द्विभाषिक

(Integrated and Bilingual)

# बालभारती

## इयत्ता पहिली भाग–४

## Standard One Part-4

(मराठी माध्यम)

विनामूल्य वितरणासाठी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २९.०६.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

एकात्मिक व द्विभाषिक

(Integrated and Bilingual)

# बालभारती

## इयत्ता पहिली भाग–४

## Standard One Part-4

(मराठी माध्यम)



समग्र शिक्षा

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

**प्रथमावृत्ती : २०२१**
**सुधारित आवृत्ती : २०२२**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**संपादन सदस्य**

श्री. रविकिरण जाधव
श्रीमती सविता वायळ
श्रीमती उज्ज्वला गोडबोले
श्री. संतोष पवार
डॉ. संदीप निकम
श्रीमती तरुबेन पोपट
डॉ. किरण धांडे
श्रीमती सुवर्णा पवार
श्रीमती अनुराधा चव्हाण
डॉ. अजयकुमार लोळगे

**मुखपृष्ठ**

घनश्याम देशमुख

**चित्रकार**

मयुरा डफळ
मृणाल देशपांडे
श्री. मनोज पाटील
श्रीमती अश्विनी कुलकर्णी

**अक्षरजुळणी**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**संयोजन**

**श्री. रविकिरण ज. जाधव**
प्र. विशेषाधिकारी, कार्यानुभव

**श्रीमती सविता वायळ**
विशेषाधिकारी, मराठी

**श्रीमती उज्ज्वला गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी, गणित

**श्री. संतोष पवार**
प्र. विशेषाधिकारी, इंग्रजी

**डॉ.संदीप निकम**
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी, कार्यानुभव (सेवानिवृत्त)

**निमंत्रित सदस्य**

श्रीमती वीणा हावनूरकर
श्री. प्रदिप पालवे
श्रीमती मनिषा यादव
श्रीमती तेजस्विनी आळवेकर
श्रीमती वृषाली गायकवाड
श्री. संदीप वाकचौरे
श्री. अजित राक्षे
श्रीमती स्वाती ताडफळे
श्रीमती रेणू तारे
श्रीमती ज्योती बेलवले
श्री. विक्रम अडसूळ
श्रीमती ज्योत्स्ना खोजे
श्रीमती कुसुम सहाणे
श्रीमती वैशाली शेवाळे
श्री. श्रीधर नागरगोजे
श्रीमती संजीवनी पवार
श्रीमती गौरांगी सावंत
श्री. राहुल सुरवसे
श्रीमती हर्षा चव्हाण
श्रीमती मंजुषा नंदेश्वर
श्रीमती मीनाक्षी खरटमोल
श्री. गणेश कोलते
श्रीमती प्रज्ञा हळीकर
श्री. ज्ञानदेव नवसरे

**तज्ज्ञ मार्गदर्शक**

श्रीमती फरझाना दोहदवाला
श्रीमती तसनीम हुसेन
श्रीमती अनुजा डांडीवाला

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**निर्मिती**

**सचिन मेहता**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी

**नितीन वाणी**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2022-23/50,000

**मुद्रक**

M/S.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**यादवारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

(The Constitution of India)

# भारताचे संविधान

भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

(Fundamental Duties of the Citizens)

अनुच्छेद ५१ क

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना (Preface)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०चा विचार करून शिक्षणातील एकात्मिक दृष्टिकोनावर आधारित एकात्मिक पाठ्यपुस्तकाची निर्मिती व अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. Learn how to learn व Lifelong Learner यांवर या शैक्षणिक धोरणात भर देण्यात आलेला आहे. त्याचबरोबर एकात्मिक शिक्षणावरही भर देण्यात आलेला आहे.

**'इयत्ता पहिली' च्या** या पाठ्यपुस्तकाची निर्मिती एकात्मिक स्वरूपात करण्यात आली असून भाषा, गणित, इंग्रजी आणि खेळू, करू, शिकू या विषयांचा एकत्रित विचार करण्यात आलेला आहे. आर्ट इंटिग्रेटेड (Art Integrated) आणि स्पोर्ट इंटिग्रेटेड (Sport Integrated) दृष्टिकोनाचा विचारही पाठ्यपुस्तक करताना केलेला आहे आणि त्यासाठीच खेळू, करू, शिकू हा विषयही यात सामावून घेतला आहे. बालकांमध्ये वय वर्ष आठपर्यंत एकाचवेळी अनेक भाषा शिकण्याची क्षमता असते, याचा विचार करून पाठ्यपुस्तकात गरजेनुसार द्विभाषिक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे.

या विषयांचा आशय मी आणि माझे कुटुंब, पाणी, प्राणी, वाहतूक व आपले मदतनीस या विशिष्ट विषयसूत्रांभोवती (Themes) गुंफलेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिसरातून पाठ्यपुस्तकातील आशय स्पष्ट होणार आहे. विद्यार्थ्यांच्या अनुभवांवर आधारित उदाहरणांसह आशय स्पष्ट करण्याचा प्रयत्न यातून केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी आणि भावविश्वाशी निगडित असलेल्या अनुभवांना आशयाची जोड देऊन आणि चित्रे, रंग यांचा वापर करून पाठ्यपुस्तक आकर्षक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कृतीला आणि विचाराला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक आशय हा अध्ययन निष्पत्तीला जोडण्यात आलेला आहे. कृती, खेळ, कोडी, चित्रकला, गोष्टी आणि गाणी यांचा उपयोग करून अध्ययन-अध्यापन आनंददायी होण्यासाठीचा प्रयत्न या पाठ्यपुस्तकात केलेला आहे.

या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच पाठ्यपुस्तकात अनेक प्रतीकांचा (emoji) उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतीके पाहूनच विद्यार्थ्यांना कोणती कृती करावयाची आहे याचा बोध होऊ शकतो. याबाबतची माहिती पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीच्या भागातच देण्यात आलेली आहे. विचारक चाव्या (Thinker Keys) आणि सहा थिंकिंग हॅट्स (Six thinking hats) यांचा वापर करण्यात आलेला आहे. यांद्वारे विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि कल्पनांना चालना मिळणार आहे त्यामुळे इयत्ता पहिलीपासूनच विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, विश्लेषणात्मक विचार, तार्किक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी विकसित होण्यास मदत होणार आहे.

या पाठ्यपुस्तकाचे एकूण चार भाग असून प्रत्येक भागासाठी स्वतंत्र पाठ्यपुस्तक आहे. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच भागाच्या पाठ्यपुस्तकाचे अध्ययन करायचे असल्याने विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी होणार आहे. या पाठ्यपुस्तकाची अंमलबजावणी सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून सर्व शाळांमध्ये करण्यात येत आहे.

२१ व्या शतकातील विद्यार्थी सक्षम व्हावा, यासाठी आपणा सर्वांना शुभेच्छा!

**कृष्णकुमार पाटील**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २ एप्रिल २०२२ (गुढीपाडवा)
भारतीय सौर दिनांक : चैत्र १२, शके १९४४

# एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी (Marathi)

**अध्ययनार्थी –**

01.01.01 विविध उद्‌देशांसाठी स्वत:च्या भाषेचा किंवा शाळेतील माध्यम भाषेचा वापर करून गप्पागोष्टी करतात. उदा., कविता, गोष्टी ऐकवणे, माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारणे, स्वत:चे अनुभव सांगणे.

01.01.02 ऐकलेल्या गोष्टींविषयी (गोष्ट, कविता इत्यादी) गप्पा मारतात, आपले मत व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.

01.01.03 भाषेतील विशिष्ट ध्वनी आणि शब्द यांच्याशी खेळण्याचा आनंद घेतात. उदा., भिंगरी, झिंगरी.

01.01.04 लिखित साहित्य आणि चित्र स्वरूपातील साहित्य यांतील फरक सांगू शकतात.

01.01.05 चित्रातील सूक्ष्म व दृश्य पैलूंचे बारकाईने निरीक्षण करतात.

01.01.06 चित्रातील वा चित्रमालिकांतील घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना, कृती आणि पात्र यांना एकसंधपणे पाहून त्यांचे वर्णन करतात.

01.01.07 वाचलेल्या गोष्टी, कविता यांतील अक्षरे/शब्द/वाक्ये इत्यादी पाहून आणि त्यांचे ध्वनी ऐकून, समजून ओळखतात.

01.01.08 परिसरातील छापील मजकूर व त्याचा उद्‌देश यांचा संदर्भाने अंदाज लावतात. उदा., वेष्टणावर लिहिलेले ओळखून गोळी/चॉकलेटचे नाव सांगणे.

01.01.09 लिखित साहित्यातील अक्षरे, शब्द आणि वाक्ये ही एकके ओळखतात. उदा., 'माझे नाव विमल आहे.' हे कोठे लिहिले आहे ते दाखव/यात 'नाव' हा शब्द कोठे आहे./'नाव' या शब्दातील 'व' वर बोट ठेव.

01.01.10 परिचित/अपरिचित मजकुरामध्ये (उदा., मध्यान्ह भोजनाचा तक्ता, स्वत:चे नाव, इयत्ता, आवडत्या पुस्तकाचे नाव) रस घेतात, गप्पागोष्टी करतात आणि त्यांचे अर्थ शोधण्यासाठी विविध युक्त्यांचा वापर करतात. उदा., केवळ चित्र किंवा चित्र व मजकूर यांच्या मदतीने अंदाज करणे, अक्षर व ध्वनी यांच्या संबंधांचा वापर करणे, पूर्वानुभव आणि माहितीच्या आधारे अंदाज करणे.

01.01.11 वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात.

01.01.12 शाळेबाहेर आणि शाळेत (वाचनकोपरा/वाचनालय) आपल्या आवडीच्या पुस्तकांची स्वत: निवड करतात आणि वाचण्याचा प्रयत्न करतात.

01.01.13 लेखन शिकताना ऐकलेले आणि आपल्या मनातील विचार, विकासस्तरानुसार चित्रे, आडव्या-तिरप्या रेषा, अक्षर आकृत्या, स्वयं-पद्‌धतीने लेखन आणि स्व-नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून आपल्या पद्‌धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

01.01.14 स्वत: काढलेल्या चित्रांची नावे लिहितात. उदा., केरसुणीचे चित्र काढून त्याचे 'लोटणं' असे स्वभाषेतील नाव लिहिणे.

# एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली अध्ययन निष्पत्ती : गणित (Mathematics)

**अध्ययनार्थी –**

01.71.01 १ ते २० (1 to 20) पर्यंतच्या संख्यांवर कृती करतात.

01.71.02 वस्तूंचा आकार आणि लहान-मोठेपणा यानुसार वस्तूंचे वर्गीकरण करतात.

01.71.03 वस्तूंच्या, चित्रांच्या किंवा चिन्हांच्या साहाय्याने २० पर्यंतच्या संख्यांची नावे म्हणतात आणि मोजतात.

01.71.04 १ ते ९ (1 to 9) अंकांचा वापर करून वस्तू मोजतात.

01.71.05 २० पर्यंतच्या संख्यांची तुलना करतात. उदा. वर्गातील मुले आणि मुली यांपैकी कोणाची संख्या जास्त आहे, हे सांगतात.

01.71.06 दैनंदिन व्यवहारात बेरीज-वजाबाकीसाठी १ ते २० (1 to 20) पर्यंतच्या संख्यांचा वापर करतात.


01.71.07 वस्तू वापरून ९ पर्यंतच्या संख्यांच्या, बेरजांची रचना करतात. उदा. ३+३ हे उदाहरण ३ च्या पुढे ३ पायऱ्या मोजून ३+३=६ असा निष्कर्ष काढतात.

01.71.08 वस्तू वापरून १ ते ९ अंकांच्या मदतीने वजाबाकी करतात. उदा. ९ वस्तूंच्या समूहातून ३ वस्तू बाजूला काढतात आणि उरलेल्या वस्तू मोजून ९-३=६ असा निष्कर्ष काढतात.

01.71.09 दैनंदिन जीवनातील ९ पर्यंतच्या संख्यांच्या बेरीज-वजाबाकीवर आधारित प्रश्न सोडवितात.

01.71.10 ९९ (upto 99) पर्यंतच्या संख्या ओळखतात आणि अंकांत लिहितात.

01.71.11 आकार, वस्तू आणि संख्यांमधील आकृतिबंधाचे निरीक्षण करतात. आकृतिबंधाचा विस्तार करतात आणि निर्मिती करतात.

- 
- १, २, ३, ४, ५, ..................
- १, ३, ५, .......................
- २, ४, ६, .......................
- १, २, ३, १, २, ..., १, ..., ३, ........

01.71.12 चित्रे/अंक वापरून माहिती गोळा करतात. नोंद करतात आणि चित्रे पाहून सोप्या माहितीचा अर्थ लावतात. उदा. मूल बागेतील चित्रात विविध प्रकारची फुले पाहून या बागेत विशिष्ट रंगांची फुले जास्त आहेत हा तर्क/अनुमान काढतात.

01.71.13 शून्य (zero) ही संकल्पना समजून घेतात.

# एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली अध्ययन निष्पत्ती : इंग्रजी (English)

**The Learner –**

01.17.01 Learns and names English words for familiar objects and pictures.

01.17.02 Recognizes/Identifies letters of the alphabet and their sounds correctly.

01.17.03 Differentiates between small and capital letters in print.

01.17.04 Sings/Recites poems/rhymes with proper rhythm and actions.

01.17.05 Listens and gives appropriate verbal/non-verbal responses.

01.17.06 Understands the sequence of events and stories in simple narration.

01.17.07 Carries out simple instructions, commands and acts accordingly.

01.17.08 Listens to English words, greetings, polite forms of expression, simple sentences and responds in English or mother tongue.

01.17.09 Speaks about self / situation / pictures in English.

01.17.10 Uses nouns such as ‘boy’, ‘sun’ and prepositions like ‘in’, ‘on’, ‘under’ etc.

01.17.11 Writes simple words like ‘fan’, ‘hen’, ‘rat’, etc.

01.17.12 Listens and enjoys fables and short stories.

01.17.13 Identifies different shapes.

01.17.14 Counts numbers up to 10.

01.17.15 Enjoys rhymes, songs and poems.

01.17.16 Responds appropriately to commands given by teachers etc.

01.17.17 Uses stock expressions in face to face interactions.

01.17.18 Narrates / Enacts a familiar story or event.

01.17.19 Associates words with pictures.

# एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली अध्ययन निष्पत्ती : खेळू करू शिकू (Play Do Learn)

| अ.क्र | विषय | घटक | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| १ | खेळू P | 01. आरोग्य | 01. आरोग्याच्या चांगल्या सवयी समजून घेऊन त्यांचे पालन करतो.<br>02. क्रीडांगणाशी संबंधित गोष्टींची माहिती घेतो. |
| | | 02. विविध हालचाली व योग्य शारीरिक स्थिती | 03. योग्य शरीरस्थिती ठेवून विविध हालचालींचा सराव करतो. |
| | | 03. खेळ व शर्यती | 04. विविध प्रकारच्या खेळांत रुची घेतो. शर्यतीत सहभागी होतो. |
| | | 04. कौशल्यात्मक उपक्रम | 05. कौशल्यात्मक उपक्रमांचा सराव करतो. |
| | | 05. व्यायाम | 06. सर्व सांधे व स्नायूंना उत्तेजित करण्यासाठी योग्य व्यायाम करतो. |
| २ | करू W | 01. गरजाधिष्ठित उपक्रम<br>• जलसाक्षरता<br>• आपत्ती व्यवस्थापन | 01. वर्गाचे सुशोभन करुन दिनविशेष व परिसरातील लघु उद्योगांची माहिती सांगतो.<br>02. पाण्याचे विविध उपयोग सांगतो. पाण्याविषयी बडबडगीते, गोष्ट, पाणी साठवण्याची साधने सांगतो व चित्रे रंगवतो.<br>03. भूकंप, पूर, त्सुनामी, वणवा, वीज कोसळणे या आपत्तींची चित्रे ओळखतो. |
| | | 02. अभिरूचीपूरक उपक्रम | 04. परिसरातील उपलब्ध साहित्यापासून आधुनिकतेशी सांगड घालून अभिरूचीनुसार साहित्य तयार करतो. |
| | | 03. कौशल्याधिष्ठित उपक्रम | 05. गरजा आणि समस्या यांच्याशी निगडित कौशल्यपूर्ण समाजोपयोगी साहित्य निर्माण करतो. |
| | | 04. ऐच्छिक उपक्रम<br>उत्पादक उपक्रम<br>• अन्न, वस्त्र, निवारा | 06. उत्पादनास आवश्यक प्राथमिक कौशल्य आत्मसात करुन मर्यादित अर्थोत्पादन करता येणाऱ्या उपक्रमांत सहभागी होतो.<br>07. अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित उपक्रमात सहभागी होतो. |
| | | 05. तंत्रज्ञान क्षेत्र, वाहतूक सुरक्षा | 08. संगणकाचे विविध भाग ओळखून बाह्य भागांची हाताळणी करतो.<br>09. वाहतुकीचे नियम समजून घेतो. |
| | | 06. इतर क्षेत्र-पशु-पक्षी संवर्धन | 010. विविध पाळीव प्राणी व पक्षी ओळखतो व त्यांचे उपयोग सांगतो.<br>011. चित्राद्वारे प्राणी व पक्षी यांचे अवयव सांगतो. |
| ३ | शिकू A | 01. चित्र | 01. आवडीप्रमाणे गिरगिटतो तसेच गिरगिटलेल्या भागावर वर्तुळ, त्रिकोण, चौकोन काढून रंगकाम करतो. योग्य क्रमाने ठिपके जोडून रंगवतो.<br>02. रेषांच्या विविध आकारांपासून सोपे आकार काढतो तसेच नक्षीकाम करतो.<br>03. ठसेकाम व चिकटकाम (कोलाज) करतो. रंगांची ओळख करून घेतो व चित्र रंगवतो. सुलेखनासाठी रेषांचा सराव करतो. |
| | | 02. शिल्प | 04. चिकटकाम व मातकामाच्या साहाय्याने विविध वस्तू तयार करतो. |
| | | 03. गायन | 05. बडबडगीत, समूहगीत तालासुरात म्हणतो. |
| | | 04. वादन | 06. विविध वस्तूंवर आघात करून आवाजाची निर्मिती करतो.<br>07. वाद्यांची ओळख करून घेतो. तालात टाळ्या वाजवतो. |
| | | 05. नृत्य | 08. हात व पायाच्या लयबद्ध हालचाली करतो. बडबडगीत व समूहगीतावर अभिनयनृत्य करतो. |
| | | 06. नाट्य | 09. रोजच्या व्यवहारातील कृतींच्या मदतीने अभिनय व नाट्याची ओळख करून घेतो. कायिक व वाचिक अभिनय सादरीकरण करतो. |

**(01.P.01.01 याचा अर्थ इयत्ता. विषय. घटक. अध्ययन निष्पत्ती)**

## पाठ्यपुस्तकात वापरण्यात आलेल्या प्रतीकांची ओळख
## (Introduction of emojis used in the textbook)


चित्र काढ.
(Draw a picture.)


रंग भर.
(Fill the colours.)


गाणे गा.
(Sing a song.)


मैदानी खेळ
(Outdoor games)


बैठे खेळ
(Indoor games)


कृती कर.
(Do activity.)


अभिनय कर.
(Enact.)


निरीक्षण कर.
(Observe.)


बघ व कर.
(Look and do.)


ऐक व म्हण.
(Listen and say.)


संवाद साध.
(Converse.)


चर्चा कर.
(Discuss.)


वाच.
(Read.)


मोज व सांग.
(Count and tell.)


लिही.
(Write.)


वर्गीकरण कर.
(Classify.)


कोडी सोडव.
(Solve the puzzles.)


चिकित्सक विचार कर.
(Think critically.)


पुढील संबोधाकडे
(Towards the next concept)

# २१ व्या शतकातील कौशल्ये
## (21st century skills)

### अध्ययन कौशल्ये / Learning Skills

- चिकित्सक विचार — Critical Thinking
- सर्जनशीलता — Creativity
- सहकार्य — Collaboration
- संप्रेषण — Communication

### साक्षरता कौशल्ये / Literacy Skills

- माहिती — Information
- माध्यम — Media
- तंत्रज्ञान — Technology

### जीवन कौशल्ये / Life Skills

- लवचीकता — Flexibility
- नेतृत्व — Leadership
- पुढाकार — Initiative
- उत्पादकता — Productivity
- सामाजिक कौशल्ये — Social Skills

### Six Thinking Hats

- तथ्ये/वस्तुस्थिती — Facts
- फायदे — Benefits
- प्रक्रिया — Process
- सर्जनशीलता — Creativity
- भावना — Feelings
- तोटे — Disadvantages

### *Thinker Keys*

- *The Picture*
- *Brainstorming*
- *Construction*
- *Commonality*

### वाहतूक व आपले मदतनीस

- वाहतूक व मदतनीस यांची ओळख — Introduction of transport and community helpers
- वाहतूक व मदतनीसांचे प्रकार — Types of transport and community helpers
- वाहतूक व मदतनीसांचे महत्त्व — Importance of transport and community helpers
- वाहतूक व मदतनीसांप्रती माझी जबाबदारी — My responsibility towards transport and community helpers

# वाहतूक व आपले मदतनीस
# (Transport and Our Community Helpers)



# गाडी आली गाडी आली

गाडी आली गाडी आली – झुक् झुक् झुक्
शिटी कशी वाजे बघा – कुक् कुक् कुक्


इंजिनाचा धूर निघे – भक् भक् भक्
चाके पाहू तपासून – ठक् ठक् ठक्

जायाचे का दूर कोठे – भूर भूर भूर
कोठेही जा नेऊ तेथे – दूर दूर दूर

गाडीमधे बसा चला – पट् पट् पट्
सामानही ठेवा सारे – चट् चट् चट्
तिकिटाचे पैसे काढा – छन् छन् छन्
गाडीची ही घंटा वाजे – घण् घण् घण्

नका बघू डोकावून – शुक् शुक् शुक्
गाडी आता निघालीच – झुक् झुक् झुक्

– वि. म. कुलकर्णी





## आवाजाचे शब्द लिही.
## (Write the words that denote sound.)



छन् छन् छन्

नाणी
(coins)





घंटा
(bell)




इंजिन
(engine)



सामान
(luggage)



शिटी
(whistle)
(विस्ल्)



चाके
(wheels)

**चला शिकूया.**


- साभिनय व तालासुरात गीतगायन करणे.
- गाण्याचा आनंद घेणे.
- भाषेतील विविध ध्वनी आणि शब्द ओळखता येणे.
- लयबद्ध शब्दांचे लेखन व वाचन करता येणे.




# वाहतुकीची साधने व प्रकार
# (Means and Modes of Transport)



## On Road



सायकल
**bicycle**



जीप
**jeep**




रिक्षा
**rickshaw**




स्कूटर
**scooter**



बस
**bus**



बैलगाडी
**bullock cart**



मोटार
**car**




इको बाईक
**eco-bike**



ट्रॅक्टर
**tractor**



ट्रक
**truck**




मोटारसायकल
**motorcycle**



रुग्णवाहिका
**ambulance**

# वाहतुकीची साधने व प्रकार
# (Means and Modes of Transport)

## In Air



विमान
**aeroplane**



हेलिकॉप्टर
**helicopter**

## On Rail / Track



मेट्रो
**metro**



आगगाडी
**train**



मालगाडी
**goods train**

## On Water



जहाज
**ship**




होडी
**boat**



शिकारा बोट
***shikara* boat**



## वाहतूक मार्गांनुसार वर्गीकरण कर.
## (Classify according to the modes of transport.)






| | | |
|---|---|---|
| २ | | |

(by road)



| | |
|---|---|
| | |

(by air)



| | | |
|---|---|---|
| | | |

(by water)




| | | |
|---|---|---|
| | | |

(by rail)

१





१०



११

६





३


९




४




२



८




७





५

## Write the correct letter A, B, C or D in ◯ ▭ ⬡
(A, B, C किंवा D पैकी योग्य अक्षर ◯ ▭ ⬡ मध्ये लिही.)




aeroplane - ⬡ A
(विमान)

bicycle - ⬡
(सायकल)

train - ⬡
(आगगाडी)

boat - ⬡
(होडी)

car - ⬡
(कार)

bullock cart - ⬡
(बैलगाडी)

ship - ⬡
(जहाज)

helicopter - ⬡
(हेलिकॉप्टर)

**चला शिकूया.**

- वाहतुकीची साधने व प्रकार ओळखता येणे.
- वाहतुकीची साधने व त्यांचा उपयोग सांगता येणे.

# चित्र गप्पा-आपले मदतनीस
## (Picture Talk-Our Community Helpers)


डॉक्टर (Doctor)




शिक्षक (Teacher)

# चित्र गप्पा-आपले मदतनीस
## (Picture Talk-Our Community Helpers)

**पोलीस (Police)**




**सैनिक (Soldier)**

# गती (Speed/Motion)

चालत चालत जायचा माणूस
आपल्या दोन पायांवर,
त्यात केवढी गती आली
चाकाचा शोध लागल्यावर.





येण्याजाण्यासाठी लोक
वापरत असत बैलगाडी,
टांगा ओढतो टप्‌टप्‌ घोडा
त्यालाच म्हणती घोडागाडी.





पायंडल मारता धावायची
दोन चाकांची सायकल,
पेट्रोल भरता पळू लागली
वेगात मोटारसायकल.





दोन गावे जोडायला
बसगाडी सडकेवर,
इकडून तिकडे गावोगाव
लोक जातात भराभर.



विनामूल्य वितरणासाठी



कोळसे खात धावायची
आगगाडी रुळावर,
त्यात झाली सुधारणा
आता चालते विजेवर.






सागराच्या सफरीसाठी
जहाज आणि बोटी,
आभाळाच्या भरारीची
माणसाला हौस मोठी.



पंख नसून माणसाने
झेप घेतली आभाळात,
विमानात फिरू लागला
देश आणि परदेशांत.



फिरणे असे सोपे झाले
जमीन, पाणी, आकाशात,
अंतराळयानामधून
आता जाती अवकाशात.

**चला शिकूया.**

- साभिनय व तालासुरात गीतगायन करणे.
- गाण्याचा आनंद घेणे.



## अर्थपूर्ण वाक्ये तयार कर व लिही.
## (Frame meaningful sentences and write.)

| | | |
|---|---|---|
| सूरज | होडी | चालव. |
| तेजस | सायकल | बघ. |
| तुषार | विमानाचा | आवाज ऐक. |
| सागर | शिक्षकांना | जा. |
| सुप्रिया | डॉक्टरांकडे | विचार. |
| जॉन | घोडागाडीत | पाणी दे. |
| अनघा | सैनिकदादाला | सलाम कर. |
| रेहान | पोस्टमनकाकांना | बस. |

सूरज सायकल चालव.

**चला शिकूया.**


- अर्थपूर्ण वाक्य तयार करता येणे.








# कागदी विमान तयार करूया.
# (Let’s make a paper aeroplane.)













कागदी होडी तयार कर.

## Let’s learn :



- The art of paper craft.
- Some easy paper crafts from the internet with the help of your teacher.





# आकार ओळख
# (Introduction to shapes)




- आकारानुसार वाहने रंगव. (Colour the vehicles as per the shapes.)

| आकार (shapes) | आयत (rectangle) | वर्तुळ (circle) | त्रिकोण (triangle) | चौरस (square) | अन्य आकार (other shapes) |
|---|---|---|---|---|---|
| रंग (colour) | | | | | कोणताही (any) |












रंगीत कागदापासून ▭,○,△,□ हे आकार तयार कर व येथे चिकटव.
(Make the shapes ▭,○,△,□ using coloured paper and paste here.)



**चला शिकूया.**

- आयत, वर्तुळ, त्रिकोण, चौरस ओळखता येणे व आकारानुसार वर्गीकरण करता येणे.

## दिलेला आकार चित्रात आहे की नाही? ते ठरव.
(Decide whether the given shape is in the picture or not.)

| वाहने \ आकार |  |  |  |  |
|---|---|---|---|---|
|  | ✗ | ✓ | ✓ | ✗ |
|  | | | | |
|  | | | | |
|  | | | | |
|  | | | | |

## रहदारी फलक बघ. आकारानुसार जोडी लाव. (Look at the traffic sign board. Match the pairs according to the shapes.)


अरूंद पूल
(Narrow bridge)


पेट्रोल पंप
(Petrol pump)


हॉर्न वाजवू नका.
(Do not blow horn)



सुरक्षितता प्रथम
(Safety first)


पुढे शाळा आहे.
(School ahead)

वर्तुळ (circle) | त्रिकोण (triangle) | चौरस (square) | आयत (rectangle) | त्रिकोण (triangle)

**चला शिकूया.**
- भौमितिक आकार ओळखून नाव सांगता येणे.
- आयत व चौरस यांतील फरक ओळखता येणे.

## वाच आणि आकार गिरव. (Read and trace the shapes.)


मी आहे
त्रिकोण (triangle).
मला तीन बाजू (sides),
तीन कोन (angles).
डोंगराच्या आकारात मी जाऊन राहीन.
माझ्यासारखा आणखी कोण?

मी आहे वर्तुळ (circle).
मला नाही बाजू नाही कोन.
ताईची बांगडी (bangle),
सायकलचा टायर (tyre)
या आकाराचे आणखी
कोण?

मी आहे आयत (rectangle).
मला चार बाजू, चार कोन (angle).
वही, पुस्तके, कंपासपेटी (compass box),
कपाटाच्या आकारात दिसतो कोण?

मी आहे चौरस (square).
मला चार बाजू चार कोन.
रूमालाच्या (handkerchief)
आकारात दिसतो मी.
माझ्यासारखा आणखी कोण?

## ठिपके जोडून आकार काढ. (Draw the shapes by joining dots.)



*Construction key*

□, ○, △, □ हे आकार वापरून वाहनाचे चित्र तयार कर.




**चला शिकूया.**

- भौमितिक आकार काढता येणे.



# वाचनपाठ





ॲना आणि टॉमच्या घरासमोर  आहे. गॅरेजमध्ये  दुरुस्त केल्या जातात. ॲना, गॅरेजला गाड्यांचा दवाखाना म्हणते. गॅरेजमध्ये     यांसारखी वाहने दुरुस्तीसाठी येतात. रघुकाका ही वाहने दुरुस्त करतात. जॉन अंकल रघुकाकांना कामात मदत करतात. ते गाड्या  चकाचक करतात. ॲना आणि टॉमला गॅरेजमधील कामे पाहताना मजा येते.







ॲना गॅरेजला गाड्यांचा दवाखाना का म्हणत असावी ?


**चला शिकूया.**

- चित्र व शब्द यांचे समजपूर्वक वाचन करता येणे.



तुला माहीत असलेले शब्द लिही. **(Write the words known to you.)**



# चित्र गप्पा
# (Picture Talk)



**चला शिकूया.**

- चित्राचे समजपूर्वक वाचन करता येणे.



# Traffic Signal
# (वाहतूक सिग्नल)






Green Light, Green Light,
What do yo say?
I say ‘Go’!
Go right away.


Yellow Light, Yellow Light,
What do you mean?
I mean, ‘wait’!
Till the light is green.

Red Light, Red Light
What do you say?
I say, ‘stop’!
And stop right away.





**Colour the traffic signal.**
**(वाहतूक सिग्नलला रंग दे.)**



| | |
|---|---|
| **Go** | (जा) |
| **Wait** | (वाट पाहा) |
| **Stop** | (थांबा) |

**Red-** लाल
**Yellow-** पिवळा
**Green-** हिरवा

**Let’s learn :**

- To know vocabulary about road traffic and traffic signals.
- To follow traffic rules (Traffic awareness).



# गणित गप्पा
# (Maths Talk)



- **खेळण्याचे नाव व किंमत सांग. (Tell the name and price of a toy.)**






## सोडव. (Solve.)

✻ एक  आणि एक  खरेदी करण्यासाठी संकेतला किती रुपये द्यावे लागतील?

१४ रु.
\+ ५ रु.
रु.

✻ टीनुला एक  आणि टीनाला एक  हवी असल्यास किती खर्च येईल?

☐ रु.
\+ ☐ रु.
रु.

✻  ची किंमत  च्या किंमती पेक्षा किती रुपये जास्त आहे? ☐

✻ सर्वांत जास्त किंमत ☐ रुपये.   ✻ सर्वांत कमी किंमत ☐ रुपये.



# बेरीज : पुढे मोजून
## (Addition : By counting forward)





अजय व रिया आई–बाबांबरोबर मामाच्या गावाला निघाले. सगळे बसस्थानकावर आले. बसस्थानकावर बस पाहून अजय बाबांना म्हणाला, ‘‘अबब... किती या बस!’’

बाबा म्हणाले, ‘‘मोज बरं.’’ अजयने बसस्थानकात उभ्या असलेल्या बस मोजल्या आणि बाबांना म्हणाला, ‘‘बाबा येथे सात बस उभ्या आहेत.’’ इतक्यात रिया म्हणाली, ‘‘अरे दादा बघ, अजून चार बस येत आहेत.’’ बाबा म्हणाले, ‘‘अजय सांग बरं, आता एकूण किती बस झाल्या?’’

अजय म्हणाला, ‘‘बसस्थानकात ७ बस आहेत. मी त्यापुढे ४ बस मोजतो म्हणजे ८, ९, १०, ११’’ आता एकूण बस झाल्या ११.

बाबा म्हणाले, ‘‘शाब्बास!’’



### आता तू सांग. (Now you tell.)


(१) बसस्थानकात आधी किती बस उभ्या होत्या?

(२) आणखी किती बस आल्या?

(३) आता बसस्थानकात एकूण किती बस आहेत?

(४) बसस्थानकात तुला किती माणसे दिसत आहेत?

(५) किती बस ड्रायव्हर दिसत आहेत?



## बेरीज : संख्यापट्टीवर पुढे मोजून
## (Addition : By counting forward using a number-strip)



६ + ५ = ? (संख्यापट्टीवर ६ च्या पुढे ५ घरे जा.)

१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २०

६ + ५ = ११




## संख्यापट्टी वापरून बेरीज कर. (Add using a number-strip.)

१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २०

५ + ४ = ☐     ८ + ६ = ☐     ९ + ३ = ☐

१० + ७ = ☐     १३ + ७ = ☐     ५ + ११ = ☐



## वजाबाकी : संख्यापट्टीवर मागे मोजून
## (Subtraction : By counting backward using a number-strip)

१६ − ७ = ? (संख्यापट्टीवर १६ च्या मागे ७ घरे जा.)

१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २०

१६ − ७ = ९



## संख्यापट्टी वापरून वजाबाकी कर. (Subtract using a number-strip.)

१ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २०

८ − ४ = ☐     १८ − ७ = ☐     २० − २ = ☐

११ − ५ = ☐     १९ − ८ = ☐     १७ − १० = ☐



# बेरीज कर.
## (Add.)




४ + ३ = ?



४ च्या पुढे ३ संख्या मोजू → ५ ६ ७


४ + ३ = ७





७ + ६ =






१० + ५ =





१५ + ४ =










**चला शिकूया.**



- पुढे मोजून बेरीज करता येणे.
- मागे मोजून वजाबाकी करता येणे.


## बेरीज २० येईल अशा संख्यांच्या जोड्या तयार कर.
## (Make the pairs of numbers to get the sum 20.)




## बेरीज सारणी पूर्ण कर.
## (Complete the addition table.)

| + | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | १० | | | | १४ | | | | | | २० |
| ११ | | १२ | | १४ | | | | | | | |
| १२ | | | १४ | | | | | | | | |
| १३ | | १४ | | १६ | | | | | | | |
| १४ | १४ | | | | १८ | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | |
| १६ | | | | | | | | | | | |
| १७ | | | | | | | | | | | |
| १८ | | | | | | | | | | | |
| १९ | | | | | | | | | | | |
| २० | | | | | | | | | | | |




*Brainstorming key*

बेरीज सारणीवरून रिकाम्या चौकटीत योग्य संख्या लिही.


# Our Community Helpers
# (आपले मदतनीस)

**Listen, repeat and sing.**
**(ऐक, माझ्यापाठोपाठ म्हण आणि गा.)**



Teachers teach us A,B,C,
Shapes and colours and 1,2,3.
Doctors help us when we're sick,
Medicines will do the trick !
Soldiers fight on borders away so far..
Farmers grow wheat, rice and jowar.
Police make living safe for you,
What do you want to do ?














**teacher** (शिक्षक) | **farmer** (शेतकरी) | **soldier** (सैनिक) | **policeman** (पोलीस)

**driver** (ड्रायव्हर) | **doctor** (डॉक्टर) | **firefighter**(अग्निशमन जवान) | **postman**(पोस्टमन)



**Look, listen and say.**
**(पाहा, ऐक आणि म्हण.)**



## Who are you?


I am a  I work in the 


I give  and 

I am a  I work on the 

I use  and 

I am a  I work in the 


I use  ,  and 

# Conversation (संभाषण)

## Listen and act. (ऐक आणि अभिनय कर.)

**Amit** : Hello! Raju, how are you?

**Raju** : Fine. Thank you.

**Amit** : I am going to my uncle's village.


**Raju** : How are you going by a car, bus or a train?

**Amit** : I am going by a train.

**Raju** : Wish you happy and safe journey!

**Amit** : Thank you so much.

**Raju** : You are welcome!




## Look and say. (पाहा आणि म्हण.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
